श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष ११ अंक ११ ] पौष [ श. १८५६

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमिह सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | एका विद्यमान संताचा अनुभव ... ... ... ... | १–७ |
| २ | अनुभव ... ... ... ... ... ... | ८–१६ |
| ३ | डिसेंबर १९३४ चें शिर्डीवृत्त ... ... ... ... | १७–२० |
| ४ | जानेवारी १९३५ चें शिर्डीवृत्त ... ... ... ... | २०–२२ |
| ५ | अनुभव ... ... ... ... ... ... | २३–३२ |


## विनंति

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V.P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

रा. आ. तर्खड,

व्यवस्थापक—श्रीसाईलीला

५१ E, पार्ले रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,

श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

## कै. श्रीम्हाळसापति अंक

श्रीसाईसद्भक्तांच्या सोयीसाठीं कै. म्हाळसापति अंक वेगळा प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. किंमत ३ आणे. तरी जिज्ञासूंनी त्याप्रमाणें मागणी करावी, ही विनंती.

रा. आ. तर्खड,

व्यवस्थापक—श्रीसाईलीला कचेरी

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,

—प्रकाशक

# अनुभव

## एका विद्यमान सन्ताचा अनुभव

**व्यक्तिपरिचय:**-यांचें नांव **नारायणस्वामी.** यांचा जन्म ता. २० एप्रिल सन १८८० साली मुरादाबाद येथील कायस्थ-माथुर कुलांतील एका अमीर घराण्यांत झाला. यांचे पूर्वज मोंगल बादशाहींत एका प्रान्ताचे दिवाण होते. हे उच्चशिक्षित पुरुष आहेत; गृहस्थाश्रमांत असतां त्यांना तीव्र वैराग्य प्राप्त झालें. गृहस्थी सोडून बाहेर पडल्यावर भिक्षावृत्तीवर राहावें लागेल, तेव्हां भीख कशी मागूं, फार लाज वाटेल. दुसरी गोष्ट म्हणजे गुरुप्राप्तीची. ह्या विचारांत कांहीं दिवस निमग्न असतां, एके दिवशीं भगवत्प्रेरणेनें एक साधु त्यांच्याकडे येऊन म्हणाला कीं, "मी बद्रि-नारायणाहून आलों आहें." त्याच्याशीं थोडा वेळ बोलणें झाल्यावर तो म्हणाला कीं, आपल्याकडे एक 'जडी' आहे; तिच्या सेवनानें भूक बिलकुल लागणार नाहीं. राईच्या दाण्याबरोबर दररोज सकाळीं जिभेवर ठेवून तिचा रस सेवन करावा. ती बरीच उष्ण आहे. बद्रिकाश्रमांतच ती पैदा होते. फिरून तो म्हणाला कीं, "ही गोष्ट कोणाला सांगू नको; सांगित-ल्यास तिच्यांतील गुण नाहीसा होत जाईल." जडीची प्राप्ति झाल्यामुळें ते फार संतुष्ट झाले, आणि दुसऱ्याच दिवशीं घरदार सोडून हरिद्वारला आले. सोबत आणिलेलें सामानसुमान सर्व देऊन टाकून तेथून ते ऋषि-केशाला आले. त्यांनीं सदरील जडीचें सतत सात दिवस सेवन केलें, परंतु भूक बिलकुल लागली नाहीं; पण शरीर बरेंच कमजोर झालें. बसण्या-उठण्याइतकीही ताकद राहिली नाहीं. त्यामुळें भजनांत विक्षेप पडूं लागला, म्हणून जडीसेवन सोडून दिलें, आणि भिक्षावृत्तीवर राहणें हा साधूचा धर्म आहे म्हणून क्षेत्रांतून भिक्षा मागून आणावी आणि ती गंगाकिनाऱ्या-वर बसून खावी, असा क्रम त्यांनीं सुरू केला.

अशा स्थितींत सद्गुरुप्राप्तीसाठीं त्यांनीं बरेच दिवस घालविले; पुष्कळ तपास केला. परंतु गुरुप्राप्ति झाली नाहीं. शिवाय सन्यासाश्रम घेण्याची इच्छा तीव्र होती, पण ती गुरुशिवाय पुरी होण्यासारखी नव्हती. अशा विचारांत असतां त्यांना वाटलें कीं, हें शरीर जगत्पावनी गंगेमध्यें सोडून धावें. हा बेत ठरविल्यावर एके रात्रीं त्यांना स्वप्नांत पुढील प्रकार दिसून आला. ते एका उंच पाहाडावर उभे होते. अशा वेळीं साधुवेषांत भगवंतांनीं येऊन सांगितलें कीं, "तुझा गुरु बद्रीनारायण, मी आहें." (तुम्हारे गुरु बद्रीनारायण हम हैं ) त्यांनीं एक कौपीन आणि एक कम्बल देऊन सांगितलें कीं, "नारायण नारायण म्हणत राहा, परमहंस हो." ह्या वचनानें संतोषित होऊन ते ऋषिकेशहून गङ्गोत्तरी-केदारनाथला येऊन तेथून बद्रिनारायणाला आले, आणि तेथें गुरुमहाराजाचें दर्शन घेतलें. त्या ठिकाणीं स्वप्नद्वारें आज्ञा झाली कीं, "चाऱ्ही धामांची यात्रा करून नर्मदेच्या तीरावर राहून भजन कर." आज्ञेप्रमाणें यात्रा करून नर्मदा-किनाऱ्यावर येऊन भजन करीत भजनसंख्या वाढवीत गेले. परमहंसवेष धारण केल्यावर त्यांना आतां १२ वर्षे होऊन गेलीं आहेत. ते प्रायः ऋषिकेश येथील स्वर्गाश्रमामध्यें राहत असतात. अहोरात्र "नारायण" नामाचा जप करीत असतात, आणि मौनव्रत स्वीकारून आहेत.

जवळ संग्रह म्हणून कांहींच ठेवीत नाहींत. कमरेला एक जाड दोरी बांधून त्यावरून गोणपाटासारख्या जाड वस्त्राचें कौपीन लावलेली असते. भगवान् आणि भगवत्प्रेमाची गोष्ट कानीं पडतांच त्यांच्या नेत्रांतून सारख्या अश्रुधारा वाहूं लागतात. त्यांनीं आपुल्या जीवनांतील साधनासंबंधीं कांहीं गोष्टी साधकासाठीं लिहून दिल्या, त्यांतील थोडया खालीं दिल्या आहेत.

## सत्य बोलणें व त्याचीं साधनें

**१ मौन धारण करणें**:—गृहस्थी मनुष्याला आपुल्या व्यवसायांत फार वेळ मिळत नसला, तरी सकाळीं स्नान केल्यावर पूजन-पाठ वगैरे करतांना दोन-चार तासपर्यंत मौन अवश्य राखलें पाहिजे.

**२ मित भाषण**:—आजकाल वृथा भाषण करण्याचा फार रिवाज पडला आहे, तो वर्ज केला पाहिजे. अगदी जरूरीच्या कामापुरतें बोलावें, अथवा ज्ञानचर्चा करावयाची असेल, तेव्हां बोलावें.

**३ एकान्त**:—आप्तसंबंधी व स्नेही लोकांत जाणेंयेणें फार थोडें ठेवावें. घरांत एकांत जागीं बसून धार्मिक ग्रंथ वाचावे अथवा जगताच्या मिथ्यत्वावर विचार करावा.

**४ वर्तमानपत्रें वाचूं नयेत**:—साऱ्या दुनियेंतील खबर समजण्यानें निष्कारण गोष्टींत मनाची स्फुरणा वाढत जाते, आणि त्या गोष्टी दुसऱ्यास सांगतांना खरें-खोटें बोलावें लागतें. त्यांत आपला शिल्लक वेळ व्यर्थ जात असतो. धर्मसंबंधी चर्चा करणारीं वृत्तपत्रें वाचण्यास हरकत नाहीं.

५ कोणाला वचन देतांना तें पूर्ण विचार करून द्यावें, आणि दिल्यावर अवश्य पुरें करावें. अगदी साध्या व्यावहारिक गोष्टींतही तें पाळावें. आपण कोणाला संध्याकाळीं पांच वाजतां अमुक स्थानीं येतों म्हणून सांगितल्यावर पांचाच्या पूर्वी चारपांच मिनिटें त्या स्थानीं अवश्य जावें.

रात्रीं झोपी गेल्यावर अवश्य विचार करावा कीं, आज सकाळपासून हा वेळपर्यंत आपण काय व कोठें खोटें बोललों आणि कोणकोणचीं पापें केलीं. निद्रावश होण्यापूर्वी हा विचार करून उद्यां आपण असें कोणतेंही कृत्य करणार नाहीं, असें मनांत ठरवावें. अशानें खोट्या गोष्टी करण्यापासून व पापाचरणापासून मन हळूहळू निवृत्त होत जाईल. असें करतांना चार-सहा दिवस एक तऱ्हेचा आळस वाटेल, पण पुढें अभ्यासानें फार आनंद उत्पन्न होत जाईल.

वरील साधनें आचरल्यानें सत्य बोलण्याचा अभ्यास जलदी होत जाईल.

सत्य बोलण्यानें एखाद्या प्रसंगीं स्वतःला त्रास होईल अथवा नुकसानही होईल; पण तें सहन केलें पाहिजे. कलियुगाचें स्वरूप असत्यमय आहे, म्हणून आज-काल खोटें अधिक फलभूत झाल्यासारखें दिसतें. परंतु

त्याचा परिणाम फार वाईट आहे.

खोटें बोलण्यापासून इतकें परावृत्त झालें पाहिजे कीं, घरांतील लहान-लहान मुलांना रंजविण्यासाठींसुद्धा खोटें सांगूं नये. घरांतील सर्वांनीच सत्य भाषण करावें असें त्यांना सांगत जावें. सत्य भाषणापासून जीवाला फार मोठा लाभ प्राप्त होतो, असा स्वतःचा अनुभव आहे.

७ "**सत्य बोला**" हें वचन मोठ्या अक्षरांनीं कागदावर लिहून तें बसणें, झोंपणें, भोजन करणें आणि स्नान करणें त्या जागांवर लावून ठेवावें. ज्या त्या ठिकाणीं तें नजरेस पडल्यानें त्याची विस्मृति होणार नाहीं.

## तप करण्याचीं साधनें

**योगाभ्यास आणि भजनः**—तप करण्याचीं हीं दोन मुख्य साधनें सांगितलीं आहेत. प्राणायामादि साधन फार उत्तम असून फार प्राचीन कालापासून महात्मे लोक तें आचरीत आले आहेत.

**भजनः**–हें साधन दोन प्रकारांनीं होत असतें. एक माळेनें आणि दुसरें माळेविना; ज्याला अजपा-जाप म्हणतात, तें भजन करण्याचें सर्वांत पहिलें साधन "माला." मनाला विरोध करणारें तें एक कोडें आहे. जोंपर्यंत माला हातांत फिरत राहील, तोंपर्यंत मुखानें भजन चालू राहील. दिवस आणि रात्र मिळून २४ तासांत मनुष्याच्या देहांतून २१,६०० श्वास बाहेर पडत असतात. त्यापेक्षां जास्ती न केलें तरी २१६०० नाम-जप एका दिवसांत अवश्य करावे. ही संख्या २०० वेळां माला फिरविल्यानें पुरी होते. आणि अभ्यासानें, आपली खात्री झाली आहे कीं, चार तासांत माळेचीं २०० आवर्तनें पुरीं होऊं शकतात. दुसरें साधन असें आहे कीं, एक लहानशी माला नेहमींच हातांत ठेवावी, तिच्यामुळें चालतां-फिरतांनाही भजन चालू राहतें. लाज बाळगण्याचें कारण नाहीं.

**अजपा-जापः**–ह्याचे चार प्रकार आहेत. (१) जिव्हेनें नामोच्चार करणें. ह्यांत थोडा आवाजही निघावा, त्यामुळें स्मरण बंद

पडत नाहीं. ( २ ) कंठानें जप करणें; ( ३ ) हृदयानें जप करणें; आणि ( ४ ) श्वासाबरोबर नाभीकडून जप करणें. ह्याप्रमाणें जिव्हेनें एक वर्ष, कण्ठानें दोन वर्षें, हृदयानें दोन वर्षें आणि नाभीनें सात वर्षें, मिळून १२ वर्षें भजन केल्यानें मनुष्य मोक्षरूप होत असतो. त्याला जागृतावस्थेंत भगवान् सन्मुख येऊन दर्शन देत असतात, आणि सर्व सिद्धि त्याच्या पायांपाशीं लोटतात. या साधनांत भोजन, निद्रा, एकांतवास, मौन इत्यादीसंबंधीं बरेंच निर्बंध पाळावे लागतात. हें साधन गृहस्थी लोकांनीं आचरण करण्यास फार कठीण आहे. दोन वर्षेंपर्यंत बराच त्रास सोसावा लागेल; पण पुढें जसजसा भजनाचा प्रभाव वाढत जाईल, तसतशी भगवत्कृपाही वाढत जाईल, आणि परमानन्दामध्यें जीवन व्यतीत होईल. आपणाला याचा प्रत्यक्ष अनुभव आला आहे. परमदयाळु प्यारे नारायणानें ह्या दासानुदासावर कृपा करून नर्मदा किनाऱ्यावरील चान्दोद नांवाच्या स्थानीं दर्शन दिलें. प्रथम छम् छम् असा आवाज ऐकू आला, नंतर **विमान** आलें; तें चार पार्षदांनीं धरलेलें होतें. त्यांतून भगवान् उतरून म्हणाले, "नारायण नारायण." याचा अर्थ असा झाला कीं, नारयाण आले आहेत. पुनः म्हणाले कीं, " बद्रिकाश्रमाला जाऊन भजन कर, तुझी ह्या ठिकाणाहून बदली झाली आहे." हें ( अजपा-जाप ) साधन केल्यावर ह्या दासाला तीन वर्षें आणि सहा महिन्यांनीं भगवंताचें दर्शन झालें होतें.

## दया

जैन मतांत ' अहिंसा परमो धर्मः ' ह्या एका गोष्टीचें साधन सांगितलें आहे. ( १ ) जीवमात्राचें रक्षण करणें; ( २ ) चालतांना खालीं मान घालून चालावें; ( ३ ) होईल तिथपर्यंत कोणालाही दुःख होईल असें करूं नये . ( ४ ) कोणी दुःखी पाहिल्यास आपल्या अंतःकरणांत दया उत्पन्न व्हावी; शक्य तों त्याचें दुःख परिमार्जित करावें. ( ५ ) कोणाच्याही जीवाला मारूं नये. गोस्वामीजींनीं म्हटलें आहे, " तुळसी आह

गरीबकी कभी न खाली जाय!" (गरीबाची हाय हाय कधींही व्यर्थ जात नाहीं.)

## दान

दान करतांना योग्य अथवा अयोग्य पुरुषासंबंधीं विचार न करतां गृहस्थी धर्म समजून साधु, ब्राह्मण, गरीब, अभ्यागत, अनाथ अशांना दान द्यावें. सर्वांत विद्यादान श्रेष्ठ म्हणून सांगितलें आहे.

आत्मभावानें चिमण्या, कबूतरें, कावळे, गाई, वानर, मासे वगैरे प्राण्यांना अन्नदान अवश्य करावें; फार पुण्य लाभतें. ह्या दासाला त्याचा पुरा अनुभव आला आहे. तुलसीदासजींचा एक महशूर दोहरा आहे.

**॥ सत्यवचन अरु लीनता परस्त्री मातुसमान।**
**। इतने में हरि ना मिले तो तुलसीदास जमान॥**

आपण अधीनता अथवा लीनता अशी प्राप्त करून घेतली कीं, लखनौमध्यें आठ-नऊ महिने राहिलों; त्या अवधींत गौतमीच्या किनाऱ्यावर जाऊन भजन केल्यावर, घांटावर हिंदु, मुसलमान वगैरे जे कोणी असत, त्या प्रत्येकाच्या पायांला हात लावीत हा दास आपल्या जागीं परत येत असे. इसामसीह बायबलमध्यें लिहिलें आहे कीं, "कोणी आपल्या एका गालावर थप्पड मारली, तर त्याच्यापुढें दुसरा गाल करावा." हा दास असें सांगतो कीं, अशा मनुष्यापुढें आपले मस्तक नमवून विनंती करावी कीं. 'हे प्यारे नारायण'! आपल्या पायांतील जुतें काढून त्यानें हें मस्तक पिटून टाका. त्यापासून माझें कल्याण होईल, आणि मी आपणाला विसरणार नाहीं.

**परस्त्रीकडे डोळे उघडून कधींही पाहूं नये.** अशा नियमांनीं वागणाऱ्यावर भगवंताची कृपा अवश्य होईल. तुलसीदास महाराजांचें वचन आहे कीं;

**॥ जापर कृपा रामकी होई। तापर कृपा करहिं सब कोइ॥**

## पुरुषार्थ

वसिष्ठमहाराजांनीं योगवासिष्ठामध्यें पुरुषार्थाला परम दैव म्हणून सांगितलें आहे. ह्या दासाच्या अनुभवांत असें आलें आहे कीं, प्रारब्धाशिवाय पुरु-

पार्थ कांहीं काम करूं शकत नाहीं. याचा असा अर्थ नव्हे कीं, पुरुषार्थ सोडून द्यावा. पुरुषार्थ तर जरूर करावा, परंतु त्याचें फळ प्रारब्धावर सोडून द्यावें. ही गोष्ट सांसारिक विषयांच्या प्राप्तीसाठीं आहे. परमार्थांत भगवत्कृपेपेक्षां पुरुषार्थाला प्राधान्य आहे.

# गुरुकृपा

गुरुकृपेनेंच सर्व साधनें होत असतात. सद्गुरु अंतरांतून आत्मरूपानें नेहमीं अनुभव देत असतात. ह्या दासाच्या कठोर हृदयाला त्या लोणी--चोरानें कृपा करून लोण्याप्रमाणें बनविलें आहे. सध्या हा दास तुलसीदासमहाराजांच्या खालीं दिलेल्या दोह्यांतील साधन करीत आहे. आशा आहे कीं, प्यारे नारायण सर्व पुरें करील. हा देह दयाळ भगवंताच्या चरणीं अर्पण केला गेला आहेच; दास म्हणून भगवान कृपा करील.

तीन टूक कौपीन के अरु भाजी बिन लोन ।
तुलसी रघुबर उरबसै, इन्द्र बापुरो कौन ।।

मोक्षाची इच्छा नाहीं. चौदा लोकांच्या राज्याची इच्छा नाहीं. ज्ञान मागत नाहीं किंवा भक्ति मागत नाहीं. हा दास प्यारे नारायणाच्या चतुर्भुज स्वरूपाला आशक्त आहे, केवळ इतकेंच इच्छितो कीं,

## 'तुम मुझे देखा करो और मैं तुम्हे देखा करूं'

कांहीं वर्षांपूर्वी गोरखपूर येथील गीता प्रेसचे मालक श्रीमान् हनुमानप्रसाद पोद्दार हे सत्संग लाभाच्या हेतूनें ऋषिकेश येथें गेल्या वेळीं, त्यांना श्रीनारायणस्वामींच्या दर्शनाचा योग घडून आला. त्या वेळीं श्री. हनुमानप्रसाद श्रीमान् भगवद्भक्त श्रीजयदयालजी यांना श्रीनारायणस्वामींनीं कथन केलेले ( वास्तविक लिहून दिलेले, कारण ते मौन धारण करून असतात ) आपले अनुभव हनुमानप्रसाद पोद्दार यांनीं प्रसिद्ध केले आहेत, त्यांतील कांहीं अनुवादरूपानें वर दिले आहेत. अनुवादक

"वासुदेव" मुंबई

## ॥ श्रीसाईबाबा प्रसन्न ॥

श्रीसाईलीलासंपादक महाशय यांस

सप्रेम कृ. शि. नमस्कार वि. वि. आपण येत्या साईलीलेंत खालील अनुभव द्यावा अशा हेतूनें पाठवीत आहें; नेहमींच माझे अनुभव प्रसिद्ध व्हावे अशी बिलकुल इच्छा नाहीं. परंतु केव्हां केव्हां श्रीसाईबाबांच्या भक्तमंडळाच्या इच्छेनें पाठवावे लागतात व ते आपण प्रसिद्ध करतां त्याबद्दल मी आपल्या मासिकाचा फार फार ऋणी आहें.

साईभक्तांचा सेवक

**साईदास**

बुधवार ता. २६ डिसेंबर १९३४ रोजीं विचार आला कीं, ता. ३०-१२-३४ रोजीं काहीं मंडळीसह शिकारीस जावें व त्याप्रमाणें मंडळीस सांगितलें. परंतु शुक्रवारीं दोन प्रहरीं माझें मन चलबिचल झालें व शनिवारीं रात्रीं शिर्डीस जावेंसें वाटलें, म्हणून मीं माझ्या मित्राला टेलिफोन केला कीं, मी उद्यां शिर्डीस जाणार आहें तर यावें. त्यानें सांगितलें कीं, जमणार नाहीं. तेव्हां मीं म्हटलें कीं, रविवारीं शिकारीस जाऊं व त्याप्रमाणें त्यानें मला शनिवारीं कळवितों म्हणून सांगितलें. परंतु माझें मन फार अस्वस्थ होतें व विचार करीत होतों कीं, शिर्डीस जावें की शिकारीस जावें ? नेहमीप्रमाणें चहा घेण्यास दुकानांत गेलों; तेथें श्री. वीरसेन जयकर भेटले ( हे साईभक्त शामराव जयकर आर्टिस्ट ह्यांचे चिरंजीव होत ) व म्हणाले कीं, त्यानें उद्यां शिर्डीस जाण्याचा बेत केला आहे. परंतु आजच ऑफिसचें सर्क्युलर निघालें आहे कीं, सोमवारीं नाताळची रजा नाहीं; तेव्हां काय करावें ? मीं म्हटलें कीं, आपण आजच साहेबांस भेटा, तो तुम्हांला जरूर रजा देईल; कारण साईलीला फार अगाध आहे. मी त्यांच्याबरोबर बोलत होतों; परंतु माझ्या मनांत शिर्डी कीं शिकार घोळत होतें. संध्याकाळीं गाडींत बसलों; तरी तेच विचार. सान्ताक्रुझला उतरल्याबरोबर

शि. सं. चे ऑ. खजीनदार श्री. बाबासाहेब तर्खड भेटले, व त्यांनीं मला श्रीसाईलीलेचा अंक दिला, तेव्हां मला वाटलें, श्रीसाईबाबांचें हें आमंत्रण आहे, तर शिर्डीस जावें व माझें मन जरा शांत झालें. ही सर्व हकीकत श्री. बाबासाहेबांस सांगत असतां आमच्या नाक्यावर पोहोंचलों; तेथें मला समजलें कीं, माझा चिरंजीव बाब वांतीच्या विकारानें सीक झाला आहे, म्हणून फिरावयास आला नाहीं. ( मुलगा अवघा ८ महिन्यांचा आहे. ) तेव्हां मीं बाबासाहेबांस म्हटलें कीं, आतां पुढें व्हा, मी मुलाला पाहून रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांच्या घरीं भेटतों. मी घरीं जाऊन पाहतों तों वांतीमुळें मुलगा फार हलक झाला आहे. एकदम माझ्या मनांत आलें कीं. उद्यां शिर्डीस गेलें पाहिजे, व चिरंजीवाच्या आईस म्हटलें कीं, उद्यां शिर्डीस निघालों. आपण येतां का ? (विचारण्याचें कारण एवढेंच कीं, एक तर मुलगा आजारी व दुसरी मोठी अडचण म्हणजे त्यांचा महिना होता) लगेच त्या म्हणाल्या कीं, होय व विचारलें कीं, शिकारीस न जातां एकदम शिर्डीस निघालांत. त्याचें उत्तर न देतां म्हटलें कीं. मी जरा रा. ब. प्रधानांच्या घरीं जाऊन येतों; तेथें मला श्री.बाबासाहेब तर्खड यांस भेटावयाचें आहे; नंतर सर्व सांगेन. रावबहादुर यांच्या घरीं गेल्यावर मी त्यांना सर्व हकीकत सांगितली, तेव्हां श्री. बाबासाहेब म्हणताल कीं, मुलाला डॉक्टरकडून तपासून व त्याच्या विचारानें न्यावें. मी म्हटलें कीं, श्रीच्या दर्शनास जावयाचें, तर डॉक्टरांस काय म्हणून विचारावें ? बाबासाहेब म्हणूं लागले कीं, जरा म्हाताऱ्याचें ऐकावें व उद्यां गेलां तर १ रुपया पेटींत टाकावा. असें सांगून त्यानें मजजवळ १ रुपया दिला. रा. ब. मोरेश्वर यांच्याकडे चहापान झाल्यावर आम्ही आपआपल्या घरीं गेलों. मी घरीं गेल्यावर, मुलाची आई सांगूं लागली कीं, दूध जिरत नाहीं व डॉक्टरनें पेटन्ट औषध आणण्यास सांगितलें, तें सन्ताक्रुझ व खार केमिस्टकडे नाहीं; तर मुंबईतून आणा. मीं म्हटलें कीं, आतां त्याची जरूरी नाहीं. उद्यां आपण शिर्डीस जाऊं. असें सांगून मी श्रीसाईबाबांच्या हातची उदी मुलाच्या कपाळीं

व पोटास लावली व थोडी तोंडांत घातली. ( ही उदी श्रींनें १९१८ सालीं गुरुपौर्णिमेच्या दिवशीं दिलेली आहे. त्याचा उपयोग फक्त जरूरीच्या वेळीं करितों व त्याचप्रमाणें कोणीही मागितली तर देत असतों. ) मुलाला रात्रभर झोंप नव्हती. शनिवारीं सकाळीं उठून आम्ही शिर्डीस जाण्याच्या तयारीस लागलों; इतक्यांत मला बाबासाहेबांनीं सांगितलेली आठवण झाली, व मी माझ्या बंधूंस डॉक्टरकडे पाठविलें. डॉक्टरसाहेबांनीं सांगितलें, मुलाला घेऊन जाऊं नका आणि जर गेलांतच, तर तेथलें दूध देऊं नका. फक्त औषध व आरारूटची पेज द्यावी. परंतु माझें मन कचरलें परंतु मुलाच्या आईनें हट्ट धरला कीं, कांहीं होवो, आजच निघावयाचें. नंतर रात्रीची गाडी पकडण्याकरितां त्यांना दोन प्रहरींच मुंबईस त्यांच्या माहेरीं पोहोंचवून मी नोकरीवर गेलों. ठरल्याप्रमाणें माझे मित्र भेटले व मीं त्यांना सांगितलें कीं, मी शिर्डीस जाणार. शिकारीचा बेत रहित केला आहे. दोन प्रहरीं मुंबईत मुलास पाहण्याकरितां गेलों. तेव्हां मुलगा जरा बरा दिसला, म्हणून मी सूर्यमहालमधून रेल्वेचीं टिकिटें काढलीं व विचार करूं लागलों कीं, आतां ऑफिसमध्यें जाऊं नये. एकदम बुधवारीं यावें. ट्रॅमच्या नाक्यावर आलों तोंच एक ट्रॅम आली व मला वाटलें कीं, ऑफिसमध्यें जाऊन दुसऱ्या मनुष्यास कामें काय काय करावयाचीं तें सांगून घरीं यावें; म्हणून मी ऑफिसमध्यें गेलों. लगेच माझ्या हातांत साहेबांनी तार दिली व सांगितलें कीं, संध्याकाळीं आगबोट येत आहे, तर आतांच पडावें ठेऊन रात्रीच्या रात्रीं मालाची डिलिव्हरी घ्यावी. या वेळीं मला वाटलें कीं, टिकिटें काढली नसतीं तर बरें झालें असतें. आतां कांहीं शिर्डीस जाणें होत नाहीं. (साईलीला अगाध आहे; हें मी दुसऱ्यास दिकवितों, परंतु मलाच कळली नाहीं ! ) एवढ्यांतच मला साईमाउलीनें दिलेल्या उदीची आठवण झाली. लगेच मीं डबीतून काढून कपाळीं लावली. साहेबांबरोबर बरेंचसें बोलणें झाल्यावर मीं जे साहेबांस सांगितलें तें त्यांस पटलें व संध्याकाळीं ६-३० वाजतां मी ऑफिसमधून घरीं (सासुरवाडीस) गेलों. मला मुलाची तब्येत

परत नादुरुस्त दिसली व कांहीं मंडळी जाण्याच्या आड आली, तर कांहीं मंडळी सांगूं लागली कीं, दसऱ्यास जाऊन आलांत तर आतां शिर्डीस काय आहे ? तुम्ही पंढरपुरास जावें. आम्ही कोणाकडे लक्ष न देतां रात्रीं ९-३० च्या गाडीनें निघालों व साईकृपेनें गाडींत ऐसपैस जागाही मिळाली.

गाडींत बसल्यावर माझ्या मोठ्या मुलीस (अजमासें ४ वर्षांची आहे ) पर्वतीबुवांची आठवण आली व विचारलें कीं, पर्वतीबुवा आपल्याला कॉफी देईल ना ? रविवारीं पहाटेस ३ वाजतां आम्ही मनमाड स्टेशनला उतरलों, तेव्हां हमालास विचारलें कीं, पर्वतीबुवा कोठें आहेत ? इतक्यांत पर्वती म्हणतो कीं, साहेब, मी आपल्या सेवेस हजर आहें व कॉफी किती कप तयार करूं ? कोपरगांवच्या गाडीस बराच वेळ होता, तेव्हां आम्हीं तोंड धुवून कॉफी घेतली. गाडी प्लॅटफार्मवर आल्याबरोबर पर्वतीनें आम्हांस चांगली जागा दिली व प्रत्येकाचीं आम्हीं अंथरुणें पसरलीं. ( तेथेंही बाबांनीं थोडी लीला दाखविली ) सुमारें ४ वाजतां मुलगा धाडकन् खालीं पडला. ह्या आवाजामुळें बाजूच्या कम्पार्टमेंन्टमधले लोक धांवत आले. मुलानें अगदीं बारिक आवाजानें आई केलें. तेव्हां त्याची आई म्हणूं लागली कीं, मूल इतकें अशक्त झालें आहे कीं, त्याच्याच्यानें रडवतही नाहीं. आपण लोकांना न जुमातां आलों व मुलाला हा धक्का बसला. मी म्हटलें कीं, तुला बाबांची लीला माहित नाहीं. मुलाला त्यांनींच हातांत झेललें असावें; नाहीं तर त्याच्या डोक्यास ट्रंकेचा कोपरा लागून खोक पडावयास पाहिजे होती ! मुलगा सावध आहे. बाबा हा खेळ तुला दाखवीत आहेत व आपण त्यांच्यावर भरंवसा ठेवला, तर ते आपलें रक्षणच करणार. तुम्हाला वाटतें कीं, पांडुरंग फक्त पंढरपुरास आहे. पण शिर्डी माझें पंढरपूर, साईबाबा रमावर हें तुला पटवून देण्याकरितांच आज आपणास त्यांच्या दर्शनाची इच्छा झाली ( तुम्ही पहिल्यानदाच ह्या वर्षी पुण्यतिथीस आलां, तेव्हां तुमचें कुडें हरवलें, तें बाबांनीं कसें दिलें व आतां ही दुसरी खेप आहे, तेव्हां हा देखावा ) नाहीं तर मी शिकारीस गेलों असतों व तेथें

मला कांहीं तरी धोका आला असता; त्यांतून बाबांनीं बचावण्याकरितां सगळा खेळ केला असेल. आम्ही शिर्डीस पोहचलों तरी मुलगा चिरचिर करीतच होता. दोनप्रहरीं साईभक्त श्री. माधवराव देशपांडे ह्यांनीं मुलाला देण्याकरितां दोन गोळ्या दिल्या. आम्ही शनिवार दोनप्रहरपासून डॉक्टरांनीं दिलेलें औषध बंद ठेविलें होतें; परंतु श्री. माधवरावांनीं दिलेली एक गोळी दिली, तीही वांतीबरोबर निघाली; म्हणून आम्ही दुसरी दिली नाहीं; कारण भरंवसा साईबाबांवर आहे व ते जें करतील तें खरें, असें म्हणून उदी लावली व संध्याकाळीं मुलगा खेळूं लागला! मुंबईंत आल्यावर सर्व हकीकत ऐकून जी मंडळी आमच्या जाण्याचा आड आली होती, ती चकित झाली! एक बरा झाला, तर दुसरी आजारी झाली, सोमवारीं आरती झाल्यावर माझी मुलगी (डॉली) सांगू लागली. कीं, बाबा माझ्याबरोबर बोलत कां नाहींत? व असें सांगून रडूं लागली. नंतर जेवण झाल्यावर ओरली होती तिला दोन-प्रहरीं चक्रीभजन चालू असतां मंदिरात घेवून गेलें; तेथून ती रडत रडत बाहेर गेली व म्हणते कीं, आज बाबा मजवर कां रागावले? बोलत कां नाहींत? जेमतेम मी व बाळा चोपदारानें तिला समजाविली. मी तिला घेऊन माडीवर गेलों आणि तिच्या आईजवळ देऊन मी बाहेर गेलों. थोड्या वेळानें तिला ज्वर चढला, त्या वेळीं सुद्धां (डॉली) बाबा बोलत कां नाहींत, म्हणून विचारूं लागली. संध्याकाळीं सहाच्या सुमारास भाऊमहाराज मंदिराजवळ आलेले पाहून मुलीची आई खालीं आली व भाऊमहाराजांना नमस्कार केला व सांगितलें कीं, मुलीला ज्वर आला आहे. तेव्हां ते खूप रागावले व म्हणाले कीं, मुलगी आमच्या स्वधीन दिली होतीस का? मग मला त्रास कां देतां? (ह्या वेळेचें त्यांचें उग्र स्वरूप पण फार पाहण्यालायक होतें.) असें म्हणून महाद्वारांत गेले. तेथून तरतच परत येऊन माडीखाली दारात बसले. ह्या वेळीं उग्र स्वरूप टाकून नेहमींप्रमाणें बोलूं लागले. (माझी मुलगी शिर्डीस गेली म्हणजे बहुतेक त्यांच्याच मांडीवर खेळत असते व केव्हां केव्हां तिला ते पैसेही देतात. ह्या खेपेस ती टांग्यांतून उतरल्याबरोबर

ताडकन् ती भाऊमहाराज बसले होते तेथें गेली व विचारूं लागली कीं, भाऊमहाराज, तुम्ही माझी वाट पाहत होतां का ? त्यानें हंसून म्हटलें कीं, होय व तिला लगेच मांडीवर घेतली. नंतर आम्ही दीक्षितवाड्यांत श्री. माधवराव यांस भेटावयास गेलों. त्यांना नमस्कार करून म्हणालों कीं, आमचे तात्याजी साईबाबांकडे गेले ( माझे वडील ) व तेव्हां एका पारशी बाईनें त्यांना नमस्कार केला तर भाऊ म्हणाले कीं, मी त्यांना म्हणजे मला सर्व देऊन टाकिलें आहे. आतां माझजवळ २ पायली दाणा उरला आहे; तर थोडा तुला पाहिजे असेल तर ने. असें म्हणून निघून गेले व आम्ही माडीवर गेलों. मुलीला झोंप लागली होती; परंतु ज्वर कमी नव्हता; तेव्हां मी तिच्या कपाळीं उदी लाविली आणि चहाकरितां साईभक्त सगुण-कडे गेलों व तेथून संध्याकाळच्या आरतीच्या वेळीं मंदिरांत गेलों. आरति होत असतां बरेच वेळां बाबा कांहीं तरी बोलत होते व त्यांचें स्वरूप मला द्वारकामाईजवळ भिंतीवर हात टेकून बोलत असत तसेंच दिसलें. नंतर माडीवर गेल्यावर मुलीच्या आईनें व मत्वसभावानें सांगितलें कीं, ती हुशार आहे व म्हणत होती कीं साईबाबा मोठे झाले, लहान झाले, व रडत होते त्यांना मीं हात धरून बाहेर काढलें. मला वाटलें कीं, तिनें तापांत बडबड केली असेल; म्हणून मीं तिला विचारलें कीं, बाबा तुझ्याबरोबर बोलले का ? तेव्हां ती म्हणाली कीं, नाहीं. तिनें वरील हकीकत सांगितली व चेहरा फार आनंदित दिसला.

रात्रीं मुलीस ताप होता. तिच्या आईनें सांगितलें कीं, तुम्ही शिवरात्रीचा बेत केला होतात, तर तुम्ही गेल्यानंतर मी पंढरपुर येथें जाऊन येणार होतें. पण आपण शिर्डीस आलों व आज मला फारच आनंद वाटत आहे व आणखी एक आठवडा काढावासा वाटतें. बुधवारीं तुम्हांला नोकरी-वर गेलेंच पाहिजे का ? तुम्ही म्हणत असतां कीं बाबा केव्हां केव्हां मंड-ळींस जाऊं देत नसत, तसाच हा प्रकार आहे कीं नाहीं ? तर आज

मुलीला ज्वर का आला ? आपण उद्यां मुलीस मुंबईस कसे घेऊन जाणार! मीं म्हटलें कीं, मला बुधवारीं नोकरीवर हजर झालेंच पाहिजे व साईबाबांना सर्व कळत आहे. त्यांच्या लीलेचा कोणालाही अंत लागला नाहीं व पुढेही लागणार नाहीं. आपलें कर्तव्य आहे कीं, आपण नेहमीं अनन्यभावें बाबांना शरण जावें.

मंगळवारीं सकाळपासून मुलीस वांती सुरू झाल्या; ९ वाजतां आमचे टांगेही आले. मुलीला कपडे चढविले. आम्हीं मुलीला बाळा चोपदाराजवळ देऊन त्याला सांगितलें कीं, तिला मंदिरांत व द्वारकामाईंत दर्शनास नेऊन आणावें; वांतीची गोष्ट आम्हीं माधवराव यांस सांगितली; त्यानीं तरतच २ गोळ्या आमच्या टांग्याजवळ आणून दिल्या. ह्या वेळीं शि. सं. चे ऑ. सेक्रेटरी श्री. सुंदरराव नवलकरही होते. श्री. सुरेन जयकर यांस रजा मिळाल्यामुळें तेही आले होते व आमच्याबरोबर मुंबईत निघाले. आम्ही टांग्यांत बसल्यावर श्रींच्या नांवाचा जयघोष केला व टांगा सुटला. कोपरगांव स्टेशनवर आल्यावर मुलगी हुषार झाली व आम्हांला श्री. माधवरावांनीं दिलेल्या गोळींचा उपयोगही करावा लागला नाहीं.

साईदास

## श्रीसाईबाबा

श्री. रा. रा. सुंदरराव नवलकर यांस सा. नमस्कार. वि. वि. माझा श्रीसाईबाबाविषयींचा अनुभव साईलीलेंत प्रसिद्ध करावा.

माझी पहिली नोकरी माझ्या आजारीपणामुळें सुटली. नंतर दोन वर्षांनीं मी पुन्हा आजारी पडलों. ऑपरेशन करावें लागलें. त्यामुळें प्रकृति सुधारली. मला ६।७ वर्षे नोकरी नव्हती. माझीं दोन मुलें, कुटुंब व मी माझ्या बंधूकडे होतों.

मला बाबांविषयीं प्रेम व भक्ति उत्पन्न करण्यास कारण आमच्या शेजारीं राहणाऱ्या डॉ. तेंडूलकर यांच्या मातुःश्री सावित्रीबाई या होत; मला आई—सावित्रीबाई—यांनीं उपदेश केला कीं, तूं बाबांचे पाय धर; ते तुला अन्नाला लावतील.

एके दिवशीं मला डॉ. तेंडूलकर यांच्या घरीं एका गृहस्थांनीं एक बाबांचा अगदीं लहान फोटो दिला. तो मी नेहमीं जवळ टेबलांत असे. थोडया दिवसांनीं मला एक नोकरी लागली. परंतु ती लौकरच सुटली. नंतर पुन्हा एक नोकरी लागली तीही दोन महिन्यांनीं सुटली. ही नोकरी सुटल्यानंतर माझी व श्री. नवलकर यांची भेट झाली. माझी व श्री. नवल-कर यांची पूर्वींची मुळींच ओळख नव्हती. मीं माझी सर्व परिस्थिति यांना सांगितली. श्री. नवलकर यांनीं मला धीर दिला. "बाबा दयाळू आहेत. त्यांना तुमची व तुमच्या मुलाबाळांची काळजी आहे. बाबांवर श्रद्धा ठेवा सबूरी व निष्ठा ठेवा." असा उपदेश केला व उदी व साई [illegible] एक पुस्तक दिलें व त्यांतील कांहीं अष्टकें म्हणण्यास सांगितलें. पुढें माझ्या बंधूंच्या आफिसांत एक जागा झाली; या जागेकरितां बऱ्याच जणांची खटपट होती. परंतु दुसऱ्या कोणास न मिळतां बाबांच्या कृपेनें ती जागा मला मिळाली व तीन महिने Trial म्हणून माझी नेमणूक झाली. ही जागा बरीच जबाबदारीची व कामही कठीण, अशी होती. परंतु बाबांच्या कृपेनें कांहीं अडचणी न येतां माझी तीन महिन्यानंतर याच जागेवर कायम नेमणूक झाली. या जागेवर मी आज दीड वर्ष काम करीत आहें. परंतु बाबांच्या कृपेनें आजपर्यंत कांहीं एक भानगड झाली नाहीं व पुढेंही बाबा होऊं देणार नाहींत अशी मला खात्री आहे.

गेले सहा महिने माझा एकटा मुलगा चि. यशवंत फार आजारी होता. मुंबईतील दोन डॉक्टर यांचीं औषधें लागू पडेनात. आमची सर्वांची पूर्ण निराशा झाली होती. त्या वेळीं डॉ. व्ही. रघुनाथ तेंडूलकर यांचें औषध

सुरू केलें. बाबांच्या कृपेनें डॉ. व्ही. रघुनाथ यांना यश आलें. आतां चि. यशवंतची प्रकृति चांगली आहे. अलीकडे माझा थोरला मुलगा चि. दत्ता हा रात्रीं झोंपेंत रडत उठत असे, व नीट जागा होत नसे. नंतर मीं त्याच्या गळ्यांत बाबांची उदी बांधली. त्यामुळें त्यास चांगली झोंप येऊं लागली. परंतु कांहीं दिवसांपूर्वी त्यानें गळ्यांतील उदी तोडली. पुन्हा त्याचें रडणें व दचकणें सुरू झालें. मला बाबांच्या गेल्या पुण्यतिथीचा जो प्रसाद व उदी आली, त्यांत उदीच्या दोन पुड्या मिळाल्या. त्यांतील एका पुडींतील उदी मीं दोघां मुलांच्या गळ्यांत ताईतांत भरून बांधली आहे. ती बांधल्यापासून दोघां मुलांच्या प्रकृति उत्तम आहेत व थोरल्या मुलाचें रडणें व उचकणें अजिबात गेलें.

आपला

बाबांचें एक लेंकरूं

श्रीसाईबाबा

# डिसेंबर १९३४ चें शिर्डीवृत्त

डिसेंबर महिन्यांत शिर्डी येथें संतप्रेमी बांधव साईभक्त मिळून ६७ मंडळी श्रीसाई-दर्शनाकरितां येऊन गेली. ती कोपरगांव, येवला, बेलापूर, अहमदनगर, मालेगांव, तळोदें नाशिक, इगतपुरी, विजापूर, वैजापूर, इन्दुर, तळबिड–सातारा, रत्नागिरी, मुंबई, विलेपार्ले वगैरे ठिकाणाहून आली होती. त्या मंडळींत पार्शी, बंगाली, शेट, सावकार, व अंमलदार मंडळी होती.

## २ देणगी, जिनसा वगैरे आल्या त्या

१ रा. रा. गणपतराव मोरेश्वर कोठारे, मुंबई— १ श्रीसाईबाबांचा फोटोफ्रेम–जर-कामानें भरलेला व १ हिरव्या रंगाची चादर.

२ रा. रा. दत्तात्रय जनार्दन दळवी,— १ श्रींच्या नैवेद्यास चांदीची वाटी, वजन १२॥ तोळे.

३ रतनबाई पार्शीण, मुंबई. चार हात रेशमी कापड.

४ कु. सदाशिव (बॅाब) वसंतराव ना. गोरक्षकर–सान्ताक्रुझ–कै. नारायण बाल-राघोबा गोरक्षकर यांच्या स्मरणार्थ श्रींस १ चांदीचा गडू वजन १३॥≈ तोळे व त्यावरील तबकडी वजन ११॥– तोळे अर्पण व दोन उदबत्ती पुडे.

५ सौ. सुशीलाबाई वसंतराव ना. गोरक्षकर सान्तक्रुझ. सभामंडपाच्या निधीकरितां रु. ५-४-३ पाया खोदण्याच्या मुहूर्ताच्या वेळीं.

६ श्रीमती विमलाबाई फणसळकर–देवास २ १ पिवळ्या कंठांचें उपरणें.

७ श्रीसाईबाबांचे शामा अथवा रा. रा. माधवराव बळवंत देशपांडे. रु. ०-२-० सभामंडपच्या निधीकरितां, पाया खोदण्याचे मुहूर्ताच्या वेळीं.

३ संस्थानच्या पोटकमिटीच्या ठरावानुरूप ह. भ. प. दासगणूमहाराज यांचे शिष्य रा. रा. किसनराव आबासाहेब सासुडे पार्थीक संस्थानच्या नवयाच्या जागेवर ता. ८।१२।३४ पासून रुजू झाले व तेव्हांपासून रोज भजन, गायन, पुराण, कीर्तन वगैरे कार्यक्रम पूर्ववत सुरू झाला आहे.

४ संस्थानचे ऑ. चिटणीस रा. रा. सुंदरराव दि. नवलकर हे मुंबईहून ता. २८।१।१४ रोजीं सभामंडपाच्या कामाकरितां, शिर्डीस निघून ता. ३१ डिसेंबर १९३४ रोजीं सकाळीं श्रीसद्गुरु साईबाबा यांचे परमभक्त रा. रा. माधवराव बळवंत देशपांडे अथवा श्रीसाईबाबांचे शामा यांच्या हस्तें शिर्डी येथें श्रीसमाधिमंदिरासमोरील उघड्या जागेवर सभामंडपाचा पाया खोदण्याचा मुहूर्त करून घेतला. सकाळपासून रा. रा. सुंदरराव दि. नवलकर, संस्थानचे ऑ. चिटणीस व रा. रा. रघुनाथ बी. आठवले ओव्हरसियर व रा. रा. गोरे कॉन्ट्रॅक्टर यांचे भागीदार रा. रा. सहस्रबुद्धे यांनीं पायाची आंखणी केली. पूजा रा. रा. बापाजी कुळकर्णी यांनीं सांगितली. त्या वेळीं रामराव ओव्हरसियर, संस्थानचे विश्वस्त रा. रा. तात्या पाटील, संस्थान-कमिटीचे एक सभासद रा. रा. वसंतराव ना. गोरक्षकर वगैरे मंडळी उपस्थित होती. गोड व धणे याचा प्रसाद वांटून झाल्यानंतर मंडळीस चहापान दिलें. आज जवळ जवळ तीन वर्षें होत आलीं, तरी सभामंडपाच्या कामाची सुरवात करण्याचें काम पैशाच्या अभावीं आजपर्यंत पडून राहिलें होतें. श्रीसद्गुरु साईबाबांचे एक जुनें भक्त रा. रा. दामोदर सावळाराम यांनीं सभामंडपाच्या कामाकरितां स्वतःची व मित्राकडून मिळून रु. १००२ ची रकम आणून दिली नसती तर तें काम अजूनपर्यंत लांबणीवर पडले असते. एवढ्या लहान रकमेनें काम भागणार नाहीं. परंतु त्यांनीं आश्वासन दिलें आहे कीं, कामाची सुरवात झाली म्हणजे पुढें रकमा आणून देतों. त्यांना मान देऊन संस्थानच्या पोटकमिटीनें सभामंडपाच्या कामास सुरवात केली आहे. आतां कामास सुरवात झाली आहे व त्यांनीं सांगितल्याप्रमाणें लवकरच रकमा पाठवून कामाचा खोळंबा होईल असे ते करणार नाहींत. मागें संस्थानच्या सभामंडपाच्या कामाकरितां संस्थानकमिटीचे ह. भ. प. दासगणू-महाराज यांनीं निधि जमविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांत त्यांना यश बिलकुल आलें नाहीं. नंतर त्यांनीं कमिटीपुढें असें मांडलें होतें कीं, सभामंडपाच्या पूर्वीची जमलेल्या निधीची रक्कम रु. १२०० या रकमेतून कामास सुरवात करावी; परंतु कमिटीस त्यांचें म्हणणें योग्य वाटलें नाहीं. निदान काम सुरवात करण्यास हातांत रु. २५०० ची रक्कम पाहिजे. ती नसल्यास कामास सुरवात करणें चांगलें होणार नाहीं. दासगणूमहाराज यांनींही सांगितलें कीं, एकदा कामास सुरवात झाली, म्हणजे मीही रकमा आणून देईन कामाची खोटी होणार नाहीं. संस्थेच्या पोटकमिटीस हातांत रु. २५०० असल्याशिवाय

कामास सुरवात करितां येईना. रा. रा. दामोदर सावळाराम रासनें यांनीं रकमेची वर सांगितल्याप्रमाणें भरपाई केल्यानें आतां कामास सुरवात झाली आहे. रा. रा. दामोदर सा. रासनें व ह. भ. प. दास गणू हे आतां त्यांनीं कबूल केल्याप्रमाणें रकमा आणून देतील, व श्रीकृपेनें सभामंडपाचें काम येत्या रामनवमीच्या आंत पुरें होईल असें इच्छितों.

## श्रीसाईबाबांची लीला

५ सभामंडपाच्या पायाच्या मुहूर्ताच्या वेळीं श्रीसाईबाबांनीं कोणत्या शास्त्रोक्त जागेवर पाया खणण्याचा मुहूर्त करावयाचा हें अन्य तऱ्हेनें दाखविलें. पायाचा मुहूर्त पायाच्या आग्नेय दिशेस करितात असें शास्त्र सांगतें. सभामंडपाच्या जागेस दोन आग्नेय कोपरे आले. एक जास्त पूर्वेकडे आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणें ह्या जास्त पूर्वेकडील कोपरा ह्या जागेवर मुहूर्त करावा. परंतु थोडा संशय आल्यावरून तेथील कांहीं मंडळीस विचारतां त्यांनीं दुसरा कोपरा सांगितला. मला तें बरोबर पटलें नाहीं. तरी मी संशयांत होतों. पायाची आखणी करण्याचें काम चालू होतें. त्या दरम्यान एक कुत्रा मंडळीची गर्दी असतांना दोनतीन वेळा सभामंडपाच्या जागेवर आला. त्यास मंडळीनें दोनतीन वेळा हाकूनही लावला. तरी तो नेमका पूर्वेकडील कमी बाजूचा आग्नेय कोपरा जेथें माझ्या मनांतून मुहूर्त करावयाचा नव्हता, त्या जागेवर येऊन घाण केली. मनांत मीं म्हटलें, ह्या कोपरा मुहूर्तास योग्य नाहीं. मीं जो पूर्वी ठरवलेला कोपरा बरोबर आहे, व त्या शास्त्रोक्त जागेवर मुहूर्त केला. मी मुंबईस आल्यावर आमच्या भटजीस नकाशा काढून दाखविला व कोणत्या कोपऱ्यावर मुहूर्त करावयास पाहिजे, असें त्यास विचारतां ज्या जागेवर मुहूर्त झाला, तोच कोपरा बरोबर आहे, असें सांगितलें. ह्यावरून श्रीसाईबाबा भक्तास कसे सावरून धरतात व शास्त्रोक्त कामें त्यांच्याकडून करवून घेतात, ही एक बाबांची लीलाच होय.

६ शिर्डी येथील समाधिमंदिरांतील व द्वारकामाई मशिदींतील पेट्यांची मार्गशीर्ष महिन्याची आवक एकंदर रु. ४८-४-९; श्रीसमाधिमंदिर पेटी रु. ४५-१-६ व श्रीद्वारकामाई पेटी रु. ३-३-३

## सॅनिटेरियम

७ शिर्डी येथें कै. दीक्षित यांच्या खुल्या जागेवर सॅनिटेरियमच्या धर्तीवर घरें बांधावयाचीं त्याबद्दलचा प्लॅन तयार झाला आहे. तो जे घरें बांधण्याकरितां रकम

देणार आहेत, त्यांस दाखवून घरें बांधण्याच्या कामास सुरवात केली जाईल. त्या जागेंत दोन खोल्या व दोन ओटे पुढील व मागील अशी ह्या घरांची सोय होत आहे.

शिर्डी येथें हवापाणी उत्तम आहे.

साईभुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट,
मुंबई ता. ३ जानेवारी १९३५

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस
शिर्डी संस्थानकमिटी

## श्रीसाईबाबा

## जानेवारी सन १९३५ या महिन्याचें शिर्डीवृत्त

१ जानेवारी महिन्यांत शिर्डी येथें श्रीसमाधिदर्शनाकरितां १६७ श्रीसाईभक्त वसंतप्रेमी बांधव येऊन गेले. ते मुंबई, पुणें, नाशिक, सटाणा, सोलापूर, पंढरपूर, देहवाडी-जि. सातारा, जाफराबाद,-जि. औरंगाबाद, दक्षिण हैद्राबाद, सदगरी, सुरत, बडोदे, पेशावर मुरुड जंजिरा जि. कुलाबा; दोर्डी, ठाणे, व पोहेडांव या ठिकाणाहून आली होती. आलेल्या मंडळींत रा. रा. रणछोडदास नारायणदास सॉलिसिटर, मुंबई, हैद्राबादचे नरशीराज, प्रो. गणपतराजी, नरके. पुणें, रा. रा. सीताराम बालादी दळवी–सुभेदार ५ वी मराठी लाइट इन्फन्ट्री-पेशावर हे होते. त्याशिवाय पार्शी मंडळी व बायाही पुष्कळ आल्या होत्या. कांहीं भक्तांनीं श्रीस नैवेद्य व अभिषेक केले.

### २ देणगी, जिनसा वगैरे आल्या त्या

१ रा. रा. जनार्दन कृष्ण कुळकर्णी, देहवाडी.–१ तुकारामाची गाथा.

२ रा. रा. ए. लो. आसवान, पुणे--रेशमी कापड.

३ रा. रा. कैलुशरु ऐम. शेटना, दादर, मुंबई--रेशमी कापड.

४ डॉ. बानर्जी, मुंबई—१ फद रेशमी, किरमिजी रंगाचा; १ साधी हिरवी शाल; १ गुलाबी इमिटेशन सिल्कचा शेला.

५ श्रीमती सुभद्राबाई हैद्राबादकर, हैद्राबाद–रु. १०० सभामंडपाकरितां.

६ श्रीमती पिरोजबाई रामराव कोटारे, मुंबई–शिर्डी येथें कै. नवलकर यांच्या वाड्यांतील निंबाखाली दिवाबत्ती वगैरे रु. २ जानेवारी महिन्याकरितां.

## ३ सभामंडपाचा पाया भरण्याचा मुहूर्त

ठरल्याप्रमाणें ता. ९ जानेवारी १९२५ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां ( स्टँ. टा. ) श्रीसद्गुरु साईबाबा यांचे परम शिष्य शामा अथवा, रा. रा. माधवराव बळवंत देशपांडे याच्या हस्तें झाला. त्या वेळीं संस्थानचे एक विश्वस्थ व साईबाबांचे जुने भक्त व शिष्य रा. रा. तात्या ग. पाटील कोते, पी. डब्ल्यु. इरिगेशन खात्यांतील ओव्हर-सियर मंडळी रा. रा. आर्. वी. आठवले, रा. रा. रामराव वगैरे मंडळी होतीं. रा. रा. बापाजी कुळकर्णी, दासगणूमहाराजांचे एक शिष्य यांनीं पूजा सांगितली. नंतर प्रसाद पेढे वगैरे वांटून समारंभ आटोपला. आतां पाया भरण्याच्या कामास लवकरच सुरुवात करण्यांत येईल व येत्या रामनवमीपूर्वी श्रीकृपेनें पायाचें काम पुरें होऊन व सभामंडपाचे खांब उभारण्यांत येतील व स्वयंपाकघराची बाजू पूर्ण करण्यांत येईल. पैशाच्या अभावीं सर्व काम श्रीरामनवमीपूर्वी पुरें होणार नाहीं. कोणा भक्ताकडून या कामाकरितां देणगी वगैरे आली, तर काम झपाट्यानें होऊन श्रीराम-नवमीपूर्वी काम सर्व तयार होईल असा अंदाज आहे. तूर्त रुपये पांच किंवा सहा हजारपर्यंत रक्कम पाहिजे. नंतर जसजशी रक्कम मिळत जाईल, त्याप्रमाणें सभामंडपाचें पुढील काम पूर्ण करण्यांत येईल. कांहीं भक्तांनीं असें आश्वासन दिलें आहे कीं, कामास एकदा सुरवात केली, म्हणजे काम भक्तांच्या नजरेस येऊन ते कामाकरितां रकमा देतील. ह्या आश्वासनाचा संस्थानकमिटीनें विचार करून कामास सुरवात केली आहे. आतां ज्या भक्तांनीं हीं खात्रीपूर्वक आश्वासनें दिलीं आहेत त्यांच्यावर रक्कम गोळा करण्याकरितां जबाबदारी पडली आहे व त्याप्रमाणें ते सभामंडपाच्या कामाकरितां रकमा पाठवून व कामाची खोळंबणा न करितां आपल्या जबाबदारीतून श्रीसाईकृपेनें मुक्त होतील असें मी इच्छितों.

## ४ श्रीसमाधिमंदिर व द्वारकामाई मशीदमधील पेट्यांतील जमा

दोन्ही पेट्या मिळून रु. ७१-३-६ मिळाले. श्रीमंदिर पेटींत रु. ६५-१-६ व श्रीद्वारकामाई-पेटींत रु. ९४= रकमा आल्या.

## ५ शिर्डी संस्थानसमाचार

जानेवारी महिन्यात शिर्डीसंस्थान पोटकमिटीच्या दोन सभा सान्ताक्रुझ येथें रावबहादुर मोरेश्वर. वि. प्रधान यांच्या बंगल्यांत ता. ६ व २७ रोजीं भरल्या होत्या. त्यांत (१)

शिर्डीच्या येथें सभामंडपाच्या कामाचा पाया व वरील लोखंडी सांगाडयाच्या कामास सुरवात करावी व ऑ. चिटणीस यांनीं संस्थानकमिटीतर्फे काम चालवावें व कॉन्ट्रॅक्टरकडून कामाबद्दल करारपत्र वगैरे लिहून घ्यावें, असें ठरलें.

( २ ) संस्थानच्या जिनसा वगैरे कोणास वापरण्यास देऊं नयेत.

( ३ ) श्रीसमाधिमंदिरांत व श्रीद्वारकामाईंत नियम करून लावावेत.

( ४ ) संस्थानचे नवई रा. रा. किसन आबाजी पार्थीकर यांच्या नेमणुकीची मुदत माघ वद्य ३० शके १८५६ रोजीं संपते याबद्दल त्यांस कळवावें.

( ५ ) ह. भ. प. दासगणूमहाराज यांनीं येत्या श्रीरामनवमी-उत्सव करण्याकरितां शिर्डी येथें येणार नाहीं असें त्यांचें पत्र आल्यावरून त्यांस त्याबद्दल जबाब पाठविण्याचा पोटकमिटीनें मसुदा तयार करून त्यांस तो ऑ. चिटणीसमार्फत पाठविला व इतर कामें सभेंत झालीं.

## ६ इतर समाचार

शिर्डी येथें जानेवारी महिन्यांत फार थंडी पडल्यामुळें लेंडीबागेंतील केळी, गुलाब, कलमी आंबे व इतर फुलझाडें सुद्धा जळून गेलीं. जळलेल्या केळी कापून टाकल्या आहेत व त्यांस नवा फुटवा आला आहे. इतर पिकांचेंही फार नुकसान झालें आहे. ऊंस, ज्वारी वगैरे पिकांचें लाखाने मोजण्याइतकें नुकसान झालें आहे असें म्हणतात.

साईभुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट,<br>मुंबई २;<br>ता. ५ फेब्रुवारी १९३५

सुंदरराव दि. नवलकर,<br>ऑ. चिटणीस,<br>शिर्डीसंस्थानकमिटी

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योन्नमः

श्रीसाईलीला संपादकमहाशय यांस,

सप्रेम कृ. शि. सा. न. वि. वि. सोबत चतुर्थावतार श्रीकालाग्निशमन साईदत्तजन्मकथाआख्यान, गेल्या आश्विन महिन्यांतील बाबांच्या पुण्य-तिथीचा साद्यंत वृत्तांत व तीन अनुभव पाठविले आहेत. या सर्वांस आपल्या श्रीसाईलीलेच्या एका अथवा जोड अंकांत एकाच वेळीं अथवा आख्यान-अनुभव यांस तरी एकाच अंकांत प्रसिद्धि मिळण्यास नम्रतापूर्वक विनंती आहे.

## संततधारपूर्वक अभिषेकानुष्ठान, सामर्थ्य नैवेद्यसमर्पण, विस्मृत्यपराधशासन, व स्वप्न-चमत्कारानें साईदत्तजागृतीची प्रत्यक्षानुभूति

### सत्यनारायणाच्या कथेंतील साधुवाण्याच्या कलावती कन्येच्या पौराणिक कथेची सत्यता

अनुभव १

माझ्या परम स्नेह्यांचे धारले चिरंजीव सेकंड एम्. बी बी. एस्. च्या परीक्षेंत ३-४ वेळ नापास झाले. त्यामुळें त्यांना, माझ्या स्नेह्यांना व त्यांच्या मित्रमंडळीस फार खेद वाटे. माझ्या स्नेह्यांस त्यांची मित्रमंडळी प्रेमाची व कळकळीची सहानुभूति दाखवून वेळोवेळीं धीर देत. त्यांची सहानुभूति नुसती शाब्दिक नसे, पण--सक्रिय असे; तथापि सहानुभूतीला इष्ट व मिष्ट फल येण्यास कालाची व सद्गुरुकृपेची अनुकूलता लागते. परीक्षा ८-१२-३४ रोजीं आली. आठ तारीख शनिवार लेखी, अकरा तारीख मंगळवार तोंडी. यापूर्वी थोडे दिवस माझ्या स्नेह्यांना अशी प्रेरणा झाली कीं,

त्यानें या परीक्षेकरितां मित्रमंडळीच्या सहानुभूतीस दैवी अनुष्ठानाची जोड घ्यावी. म्हणून त्यांनीं पुढीलप्रमाणें कार्यक्रम आंखला.

शनिवारीं सकाळीं ८ वाजल्यापासून सायंकाळीं ५ वाजेपर्यंत ब्राम्हण-द्वारा श्रीग्रामदेवतेवर संततधारपूर्वक लघुरुद्रानुष्ठान करावें व अभिषेक संपल्यावर ग्रामदेवतेची पूजा करून नैवेद्य समर्पण करावा व नंतर माझे स्नेही व त्यांचें कुटुंब यांनीं अभिषेक-ब्राह्मण पंक्तीस बेऊन उपोषणाची पारणा करावी. रविवारीं व सोमवारीं फक्त ब्राम्हणद्वारा एकेक एकादशिनी ग्राम-देवतेवर करावी. मंगळवारीं श्रीदत्तपादुकांवर शनिवारप्रमाणेंच सर्व कार्य-क्रम करून दत्तपादुकांस पूजा-नैवेद्य समर्पण करून उपोषणाची पारणा करावी. नंतर बुधवारपासून ९ दिवस, म्हणजे ता. २० गुरुवारपर्यंत श्रीग्रामदेवतेवर एक एकादशिनी प्रत्येक दिवशीं सकाळीं करावी. गुरुवार ता. २० हा परीक्षेचा निकाल-दिवस असल्याळें त्या दिवशींही शनिवार व मंगळवारप्रमाणें कार्यक्रम करावा असें माझ्या स्नेह्यांस वाटलें; परंतु त्यांना श्रीदत्तजयंतीकरितां शिरवळास जावयाचें होतें, व त्यप्रमाणें ते, त्यांचें कुटुंब, त्याचे थोरले चिरंजीव व नातू ता० १७ सोमवार रोजीं शिरवळास निघून गेलेही.

पूर्वींचा सर्व कार्यक्रम त्यांच्या मनाप्रमाणें झाला व शिरवळासही श्रीसाईदत्तमाउलींनीं तेथील दत्तपादुकांवर व दत्तमूर्तीवर शनिवार व मंगळवार-प्रमाणें ता. २० गुरुवार रोजीं कार्यक्रम करून घेतला; परंतु सायंकाळीं ६ वाजतां अभिषेक व पूजा आटोपल्यावर श्रींस नैवेद्य समर्पण करावयाचा राहिला. तो दिवस तेथील उत्सवाचाच असल्यामुळें सर्वांची दिवसा-रात्रींचीं भोजनें होऊन माझे स्नेही व त्यांचें कुटुंब यांनींही रात्रीं उपोषण-फराळ केला.

माझ्या स्नेह्यांच्या चिरंजीवांचे प्रश्न-कागद या वेळीं चांगले गेले होते व तोंडी परीक्षाही चांगली झाली होती; त्यामुळें आपण परीक्षेंत खात्रीनें यश संपादन करूं, असा त्यांना आत्मविश्वास वाटत होता. मुलगा पास झाला, तर आम्हास तावडतोब तार कर, असें माझ्या स्नेह्यांनी आपल्या धाकट्या चिरंजीवास शिरवळास जाते वेळीं मुद्दाम बजाऊन सांगितलें होतें. शिरवळचें तार ऑफिस सायंकाळीं ५ वाजतां बंद होतें. तारऑफिसांत चौकशी करतां तार आली नाहीं असें समजलें; तेथें त्या वेळीं कोणतेंही दैनिक वृत्तपत्र येत नसल्यामुळें अन्य मार्गानें परीक्षेचा निकाल कळण्यास संधि नव्हती. माझ्या स्नेह्यास व त्यांच्या कुटुंबास श्रीसद्गुरुराज साईदत्तप्रभुचरणांजवळ आपल्या मुलाच्या परीक्षोत्तीर्णतेची कर्णमधुर वार्ता आज सायंकाळपर्यंत ऐकावयास मिळेल, अशी ५ वाजेपर्यंत आशा वाटत होती. तथापि पूर्वी ३-४ वेळा नाव पोळला असल्यामुळें निकाल समजेपर्यंत आशेच्या शुभ्र व धवल किरणांत कित्येक वेळां मधून मधून निराशेच्या काळीमेची छाया पसरे. हितसंबंध असलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या मनांत आशा-निराशेचें रणकंदन माजलें. केवळ तार आली नाहीं, म्हणून मुलगा उत्तीर्णच झाला नसेल, असेंही निश्चयात्मक वाटेना. धाकटे चिरंजीव तार करण्यास कधींही चुकणार नाहींत, किंवा हयगय अथवा कंटाळाही करणार नाहींत, ही पक्की खात्री ! तथापि न जाणो, कदाचित् काहीं अपरिहार्य अडचणच आली असेल तर? तरी सुद्धा त्यांच्या चुलतबंधूंकडून किंवा मित्रमंडळीकडून तार करण्याची व्यवस्था त्यांनीं केलीच असती. आपल्या वयोवृद्ध मातापितरांस सबंध एक रात्र खात्रीनेंच त्यांनीं चिंतांधकारांत तळमळत ठेविलें नसतें. पण उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या नंबरांत त्यांच्या वडील बंधूंचा नंबरच नसेल, तर ते तरी काय करणार? असेंही वाटे. असो. तारऑफिस बंद झाल्यापासून

फार करून निराशेचीं पिशाच्चें आपला नंगा नाच करण्यास डोकाऊं लागलीं. प्रत्येकाच्या मुखावर खिन्नतेची छटा चमकूं लागली. टवटवी मावळली. हुरूप हुषारी, उत्साह भंग होत चालला.

अपराधशासनतेची चुणुक दाखवून नंतर कल्याणच करावयाचें अशी श्रीसाईदत्तप्रभूची नेहमीची हतवटी असे. सारांश, ता. २० गुरुवारची रात्र भयंकर व घोर चिंतेंत गेली. ता. २१ शुक्रवार उजाडला. दैनिक वृत्तपत्रांच्या शोधाची गर्दी, धांदल व गडबड उडाली. प्रथमच समोर आलें तें दैनिक "तेज" पत्र, प्रकाश पाडण्याच्या किंवा निकाल लावण्याऐवजीं त्यानें आशा-निराशा यांच्यामध्यें कल्पनातीत असें नवीन प्रकारचें भांडण जुंपविलें. त्यानें फर्स्ट एम्. बी. बी. एस्.चा निकाल छापला व दुसऱ्या एम्. बी. बी. एस्.चा निकाल छापलाच नाहीं! तेव्हां आशा शंका येऊं लागली कीं, सेकंड एम्. बी. बी. एस्.चा निकाल त्या तारखेस लागलाच नसेल. परंतु दोन्ही परीक्षांचे निकाल ता. २० रोजीं लागतील असें अधिकृत रीत्या पूर्वींच जाहीर झालें होतें, असें माझ्या स्नेह्याचे चिरंजीव म्हणूं लागले. गांवांत दैनिक "टाइम्स ऑफ इंडिया" पत्र येतें असें कळल्यावरून माझ्या स्नेह्याचे नातू तें पत्र पाहावयास गेले, व सेकंड एम्. बी. बी. एस्. च्या परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या नांवांत त्यांच्या चिरंजीवांचें नांव आहे असें त्यांनीं माझ्या स्नेह्यास सांगितलें. त्या वेळीं सकाळीं १०-१०॥ चा सुमार होता. इतक्यांत माझ्या स्नेह्याच्या मुंबईच्या स्नेह्याचें त्यांना आपण तुमच्या मुलाची परीक्षा पास झाल्याचें वृत्त क्रानिकल पत्रांत वाचलें म्हणून आनंददर्शक कार्ड आलें. तेव्हां मुलगा खात्रीनें परीक्षा पसार झाला, असें माझ्या स्नेह्यास वाटून जिकडे तिकडे उत्सवगर्दींत आनंदीआनंद झाला. धाकट्या चिरंजीवाकडून तार कां आली नाहीं, हा दुसऱ्या तथापि नसत्या

आगंतुक विस्मययुक्त भीति व काळजीनें माझ्या स्नेह्यांस व त्यांच्या कुटुंबास घेरलें. शुक्रवार गेला. शनिवार गेला. रविवार उजाडला. "अतिस्नेहः पापशंकी" या संस्कृत कविवर्य कालिदासकृत अभिज्ञान शाकुंतल नाटकांतील चवथ्या अंकांत लिहिल्याप्रमाणें माझ्या स्नेह्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या मनांत प्रेमातिशयामुळें कुशंका येऊं लागल्या. त्या दिवशीं सकाळीं शिरवळचे पोस्टमास्तर सहज माझ्या स्नेह्यास भेटण्याकरतां आले. तार रात्रीनें यावयाची असतां कां आली नाहीं म्हणून माझ्या स्नेह्यांनीं त्यांना बोलतां बोलतां प्रश्न केला. तपास करून सांगतों असें म्हणून ते निघून गेले. सोमवार गेला, मंगळवार गेला. बुधवारीं सकाळीं मास्तर आले. तपास करतां, तार त्याच दिवशीं म्हणजे २० तारखेस आली, व तुमच्याकडील एका गृहस्थास दिली असें ते सांगूं लागले. तपास करतां खरोखरीच माझ्या स्नेह्यांच्या एका अनभिज्ञ मित्रानें ती घेऊन त्यानें आपल्याजवळ ठेविली व उत्सवगर्दीत ती ते माझ्या स्नेह्यास देण्यास अजिबात विसरले असें कळून आलें.

तार त्याच दिवशीं येऊन या सद्गृहस्थास तिचा इतका विसर कां पडावा, त्याच दिवशीं ती माझ्या स्नेह्यास कां मिळूं नये, ती अदृश्य कां व्हावी, त्याची ती रात्र घोर चिंतेंत व भीतींत कां जावी, याचा एकाग्र चित्तानें विचार करतां आपलें कांहीं तरी चुकलें असावें असें माझ्या स्नेह्यांस वाटलें व त्याच गोष्टीचें पुन्हा पुन्हा मनन करतां करतां ता. २० गुरुवार रोजीं सायंकाळपर्यंत साईदत्तप्रभूस संतत धारें ठेवून त्यांना नैवेद्य समर्पण केला नाहीं, हा आपल्याकडून महान् अपराध झाला ही गोष्ट त्यांच्या चटकन् लक्षांत आली. ही गोष्ट त्यांनीं आपल्या कुटुंबास व स्नेहीमंडळीसही सांगितली. पण नैवेद्य-समर्पण-विस्मृत्यपराधामुळेंच तार अदृश्य झाली, या म्हणण्यास स्वतःच्या कल्पनेखेरीज इतर बलवत्तर पुरावा, प्रत्यंतर किंवा

प्रमाण काय ? विचार व मतस्वातंत्र्यवादी चिकित्सक मंडळी ही अन्य प्रमाणविहीन गोष्ट कशी कबूल करतील ? हिची सत्यता त्यांच्या शास्त्रीय व चिकित्सक बुद्धीस कशी पटेल ? कविश्रेष्ठ कालिदासांनीं शाकुंतल नाटकांत लिहिल्याप्रमाणें संशयित गोष्टींत अंतःकरणप्रवृत्ति जें सांगेल तेंच प्रमाण हें केव्हां समजावयाचें ? ज्या वेळीं ज्यांना संशय किंवा शंका आली असेल, ते गृहस्थ सज्जन असून त्यांचें मन श्रेष्ठ (आर्य) असेल तेव्हां. असो.

माझ्या स्नेह्यांच्या कुटुंबानें मुलाची परीक्षा उतरली, तर आपण ब्राह्मण जेवावयास घालूं असा श्रीसाईदत्तप्रभूस पूर्वींच नवस केला होता. त्याप्रमाणें हा नवस शुक्रवार ता० २८ रोजीं फेडण्याचें ठरलें. तसेंच त्या दिवशीं सकाळीं नैवेद्यसमर्पणविस्मृत्यपराधाबद्दल श्रींस दोन दुधाचे अभिषेक करून दुपारीं लक्ष व काळजीपूर्वक स्वतंत्र नैवेद्य समर्पण करावयाचा असें ठरलें व ठरल्याप्रमाणें सर्व यथास्थित झालें.

त्याच दिवशीं पहाटे म्हणजे शनिवार उजाडला. माझ्या स्नेह्यांच्या कुटुंबास स्वप्न पडलें कीं, त्याच मंदिरांत बरेच ब्राह्मण जेवण्याकरतां पाटावर बसले आहेत व माझ्या स्नेह्यांचें कुटुंब त्यांना वाढीत आहे. इतक्यांत त्यांपैकीं एक ब्राह्मण मध्येंच उभे राहून माझ्या स्नेह्यांच्या कुटुंबास म्हणाले, **"अहा, आज तर आम्हांस हें जेवण मिळतेंच आहे; पण त्या दिवशीं** (अर्थात गुरुवारीं २० तारखेस) **घरांत पंचपक्वान्नें केलीं होतीं, पण आम्हाला काय मिळालें ?"** इतकें पाहून माझ्या स्नेह्यांचें कुटुंब जागें झालें व त्यांनीं हें स्वप्न माझ्या स्नेह्यांस सांगितलें. आपला तर्क अगदीं खरा आहे, आपल्या तर्कास कुटुंबाचें स्वप्न हें सबळ प्रत्यंतर आहे. नैवेद्यसमर्पणविस्मृत्यपराधाचाच हा परिणाम आहे, अनुष्ठानांत अलौकिक सामर्थ्य आहे, दैवतें जागृत आहेत, ही अनुभवसिद्ध गोष्ट

आहे अशी माझ्या स्नेह्यांची पूर्ण खात्री झाली. काय ही बाबांची अतर्क्य लीला! अपराधशासनपद्धति! व अंत:करणास प्रत्यक्ष पटविणारी व प्रसादकारि शिकवणूक!

श्रीसत्यनारायणाच्या कथेंतील साधूवाण्याची कन्या कलावती हिनें सत्यनारायणाची पूजा करून, तिचे वडील व यजमान बंदरांत आले असें ऐकतांच फार दिवसांच्या विरहानें पतिदर्शनोत्सुक झालेलें तिचें मन, प्रेमळ विचारांच्या गर्दीत व घाईत, प्रसादग्रहण करण्यास विसरलें. त्याचा परिणाम ती बंदरावर जातांच बंदरांत आलेलें जहाज एकाएकीं अदृश्य झालें. कलावती व तिची आई लीलावती ह्या दोघी विलाप करूं लागल्या. इतक्यांत आकाशवाणी होऊन कलावतीचा अपराध तिला कळला. तिनें घरीं जाऊन प्रसादग्रहण करून परत बंदरावर येतांच वडील व यजमानासह जहाज वर आलें व तिला आनंद झाला. या पौराणिक कथेंत व माझ्या स्नेह्याच्या अनुभवांत किती तरी तंतोतंत साम्य आहे! पूजेनंतर कलावती प्रसादग्रहण करण्यास विसरली. माझे स्नेही पूजेनंतर नैवेद्य समर्पण करण्यास विसरले. बंदरांत आलेलें तिचें जहाज अदृश्य झालें. माझ्या स्नेह्याच्या घरीं आलेली तार अदृश्य झाली, कलावतीस बाह्य आकाशवाणीनें तिचा अपराध कळला. माझ्या स्नेह्यांस अंत:करणांतील आकाशवाणीनें व स्वप्नाच्या दुजोऱ्यानें त्यांचा अपराध कळला. कलावतीचा कांहीं काल दु:खांत जाण्याचें तिला शासन मिळालें. माझ्या स्नेह्यांस एक रात्र भीतींत व चिंतेंत तळमळ करीत बसण्याचें शासन मिळालें. शासनांत वांटेकरी होण्यास तिकडे कलावतीबरोबर तिची माता होती. इकडे शासनांत भाग घेण्यास माझ्या स्नेह्यांबरोबर त्यांचें कुटुंब होतें.

अनुष्ठानसामर्थ्य व दैवतजागृति ती आणखी कशी असणार? साईदासपरमात्म्याच्या अस्तित्वाची साक्ष यावरून पटत नाहीं का? पौराणिक

कथा निखालस मिथ्या मानणाऱ्या, साधुसंतांवर भरंवसा न ठेवणाऱ्या, परमात्माच्या अस्तित्वाबद्दल शंका घेणाऱ्या विद्वान व विचारी सद्गृहस्थांनीं याचा मननपूर्वक अभ्यास करावा. निवळ दैवावर विश्वास ठेवून कर्तृत्व व व्यवहारशून्य बनणें केव्हांही श्रेयस्कर व प्रेयस्कर नाहीं. प्रयत्न करीत राहिलेंच पाहिजे. तथापि परमात्म व धर्मनिष्ठाभ्रष्ट होऊन चालणार नाहीं. दोहींचें अधिष्ठान अंतःकरणांत, वाचेंत व आचारांत सदैव ठेविलेंच पाहिजे. त्यावांचून नुसत्या कर्मकर्तृत्वाच्या पोकळ घमेंडीनें प्रयत्न फलद्रूप होणार नाहीं, हें निश्चित.

असो. हें माझ्या स्नेह्यांचें वागनुभव-तुलसीपत्र आज अर्धमहोदय पुण्यपर्वणीच्या शुभ दिवशीं श्रीसाईदत्तविभूच्या दिव्यांत्रिसहस्रपत्रीं अत्या-दरपूर्वक विनतशिरसा समर्पण करून आपली रजा घेतों.

ठाणें,
रविवार, पौष कृ. ३०
शके १८५६
ता. ३-२-३५　　　　　　　　**घायांचें बाळ**

---

## अनुभव २

शिरवळपासून ६-७ मैलांवर श्री. रा. रा. शंभुराव पोतनीस यांचें वडगांव या नांवचें इनाम गांव आहे. तेथें मी आज सतत ३० वर्षें नवरा-त्रांत १० दिवस कर्नाटकी पद्धतीची पूजा, त्यांच्या कर्नाटकी जगदंबेची, त्यांना दररोज ६ तास सांगत असतों. तें माझें यजमानकृत्याचें घर आहे. ती पूजा फारच जिकीरीची व भानगडीची असते. आपल्या इकडील नवरात्रांच्या पूजेसारखी नाहीं. त्या पूजेंत पुन्हा निरनिराळ्या देवतांच्या पूजेंत पूजा आहेत, योगिनी आहेत, कलश आहेत, मंडलें आहेत, त्रिकोण आहेत, चतुष्कोण आहेत, षट्कोण आहेत. सारांश, कांहीं महिने चांगला अभ्यास केल्यावांचून ती पूजा दुसऱ्या कोणास सांगतां येण्यासारखी नाहीं.

पहिल्या वर्षी माझ्या मनांत बाबांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं आराधना-विधि चालविण्याकरतां शिरडीस यावें असें आलें. येथें ज्या साईमाउलीच्या प्रेरणेनें काका देव (श्री. बा. वि. देव पौडकर) यांच्याकडून श्रीदत्तमंदीर बांधण्यांत आलें व ज्या साईदत्ताची अलौकिक ख्याति मीं काकांच्या मुखांतून

ऐकिली, त्याच साईदत्ताच्या प्रेरणेनें मला शिरडीस येण्याची इच्छा झाली. पुण्यतिथि दसऱ्याच्या दिवशीं किंवा दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशीं, शंभुराव यांच्या घरची नवरात्रसमाप्ति दसऱ्याच्या दिवशीं सायंकाळीं, तेव्हां माझी इच्छा सफल व्हावी कशी ? मला मोठा पेंच पडला. आराधनाविधि चालविण्याकरितां शिरडीस जावें, ही प्रबल व अनावर इच्छा व जाण्यास शंभुरावजींकडून परवानगी मिळणार नाहीं, ही भयंकर अडचण.

चमत्कार असा कीं, शके १८५३ सालीं शिरवळ येथें श्रीदत्त मंदिराचें काम जेव्हां सुरू झालें, तेव्हां शंभुराव पोतनीससाहेब सहज शिरवळ येथें आले: मी मनाचा हिय्या करून भीत भीत त्यांच्याजवळ आठव्या किंवा नवव्या माळेस शिरडीस जाण्याची परवानगी मागितली व ती त्यांनीं मोठ्या आनंदानें दिली. त्यांची मात्र मला २ दिवसांची सोय करून द्यावी लागली व ती माझ्या १७-१८ वर्षांच्या वडील मुलानें करण्याचें पत्करिलें. त्यामुळें मला शिरडीस आराधनाविधीच्या अगोदर १ किंवा २ दिवस बिनधोक येतां येऊं लागलें. काय ही बाबांची लीला !

यावरून शिरवळ व शिरडी यांत विलक्षण साम्य असून दोन्हीं ठिकाणच्या देवता एकरूप आहेत व दोन्ही ठिकाणचे संतमहात्मे एकाच गुरूचे शिष्य असावे असें वाटतें. संपादकमहाशय महाराज आपल्या तीक्ष्ण संशोधनानें व कुशाग्रबुद्धीनें हें गूढ उकलावें, अशी सविनय प्रार्थना आहे.

## अनुभव ३

शके १८५६ सालच्या म्हणजे नुकत्या गेलया पुण्यतिथीच्या आराधनाविधीकरितां मी अश्विन शु. ७ सोमवार रोजीं दुपारीं ४ वाजतां वडगांवाहून ( सातवे माळेसच ) शिरडीस जाण्यासाठीं निघालों. सायंकाळीं ६ वाजतां शिरवळ मोटर ( स्टँड ) अड्ड्यावर परभारें जाण्याच्या तयारीनेंच आलों. शिरवळ व पुणें यांच्यामध्यें खांबटकी व कात्रज हे दोन घाट आहेत. सायंकाळीं ६ च्या पुढें सातारा, वाई व शिरवळहून पुण्यास जाणाऱ्या व पुण्याहून शिरवळ, सातारा व वाईकडे जाणाऱ्या मोटरी बंद होतात. माझा तर निश्चय असा होता कीं, कांहीं झालें तरी शिरडीस आठव्या माळेस

निदान ११-१२ वाजेपर्यंत पोंचावयाचें. परंतु मोटरच नाहीं. आतां पुढें काय करावें अशा विवंचनेंत होतों. चमत्कार असा कीं, सुमारें अर्ध्या तासानें महाबळेश्वराहून दोन स्पेशल रिकाम्या मोटरी शिरवळ-अड्ड्यावर आल्या. त्यांच्या दोन्ही ड्रायव्हरनीं आपण होऊनच मला विचारिलें कीं, "काय, पुण्यास यावयाचें आहे का ?" मीं होय म्हटलें, व आज तुमचा मोटरीचा भाव काय आहे, असें विचारतां ते दोन्ही मुखानें एकदम गर्जना करून म्हणाले, "अहो, तुम्हाला वाटतील ते पैसे द्या. अहो, तुम्ही चार आणे दिलेत, तरी चालतील; पण चला म्हणजे झालें. अहो, तुम्हाला चार आण्यांत पुण्याच्या स्टेशनपर्यंत नेऊन सोडतों. मग तर हरकत नाहीं ना ?" असे त्यांचे प्रेमाचे व कळकळीचे शब्द ऐकतांच मला खरोखरच बाबांच्या अतर्क्य लीलेचें सानंद कुतूहल वाटलें !

मी त्यांपैकीं एका मोटरींत बसलों व पुण्याच्या स्टेशनवर खरोखरच चार आण्यांत गेलों ! मला कोपरगांवची गाडी मिळाली व माझ्या निश्चयानुरूप व हेतूप्रमाणें दुसऱ्या दिवशीं आठव्या माळेच्या ११-१२ वाजण्याच्या सुमारास शिरडीस सुखरूप पोंचलों.

संपादकमहाशय महाराज, एरवीं, शिरवळाहून पुण्याच्या स्टेशनपर्यंत ०-१२-० बारा आणे घेतात व मोटरींत कोण खेंचाखेंची व रेटारेटी ! तशांतून मी तापानें आजारी ! मला चार आण्यांत स्टेशनपर्यंत सबंध मोटर ! वाटेल तसें ऐसपैस लोळावें. मोटारींत मी एकटाच. माझ्या मागें लागून, माझी अजिजी करून चार आण्यांत सायंकालानंतर ऐसपैस एकट्याकरतां मोटर ! हा काय चमत्कार, कीं लीला, का आश्चर्य !!! शिवाय साईदत्ताच्या नगरींत गेल्यावर माझा ताप जाऊन मला पूर्ण आरामच वाटला. शिरडी व शिरवळ एक नव्हे तर काय ? बाबा व अन्या एक नव्हे तर कोण ! निःसंशय या दोन्ही विभूति, एकाच गुरूचे चेले असावे.

| | |
|---|---|
| शिरवळ,<br>मार्गशीर्ष शु. ७<br>गुरुवार श. १८५६ | आपला नम्र<br>दत्तात्रय पांडुरंग ऊर्फ<br>बगोबा मोने शिरवळकर |

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।≈, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।≈, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—श्रीसाईलीला

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठी पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून,सुवाच्य बाळबोध लिपींत असावी.पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक श्रीसाईलीला

दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. गी. चाफेकर, M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ-दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूच्या विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध रहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

बाळंतकाढा नं. १—पहिल्या दहा दिवसांना ०।४; बाळंतकाढा नं. २ दहा दिवसानंतर ०।४; बाळकडू:- मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०।८; कुमारीआसव लहान मुलांकरितां ०।१२.

सतत २५ वर्षे लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १।१० ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ०।१४
दीड रत्तल २।८ ट. ख. वें. नि.

शिवाय आमच्या कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांच्या माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स.** आयुर्वेदीय कारखाना, चेंबूर, जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २

पुणें:—श्री साईनाथ आणि कंपनी

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें रामचंद्र काशीनाथ तटणीस यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.